# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक २५/०५/२०२४ (शनिवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## वाहनासह एकुण ५,५५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक २४/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे अरोली हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा खात कडुन पांजरा मार्गे अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) ट्रॅक्टरमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून अरोली हद्दीतील मौजा खात पांजरा रोड येथे अवैध रेती संबंधाने अचानक नाकाबंदी करून **एक लाल रंगाचा भुमीपुत्र ट्रॅक्टर क्र. MH 40 CA 8638 व निळया रंगाची ट्रॉली** चा चालक **आरोपी नामे— नेहपाल दादुजी रतनपूरे, वय ४३ वर्ष रा. खात** यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर ट्रॉली चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून **एक लाल रंगाचा भुमीपुत्र ट्रॅक्टर क्र. MH 40 CA 8638 व निळया रंगाची ट्रॉली** किंमती **५,५०,०००/—रू.** मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ५०००/—रू. असा एकुण वाहनासह ५,५५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे—१) नेहपाल दादुजी रतनपूरे, वय ४३ वर्ष रा. खात २) तुशार ग्यानीराम कुर्जेकर वय ३५ वर्ष रा. खात** यांचेविरुद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. अरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी ट्रॅक्टर चालक व मालक यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी, पोहवा ललीत उईके, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर